# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या सत्तेचाळीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.१५ फेब्रुवारी, २०१३ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सत्तेचाळीसावी सभा शुक्रवारी, दि.१५ फेब्रुवारी, २०१३ रोजी दुपारी १:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ४) | मा. विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग | सदस्या |
| ५) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ७) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ११) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| १२) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | मा. सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १६) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १७) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १८) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**स्वागत :**

नव्याने निवड झालेले मा.कुलगुरु व नव्याने नामनिर्देशन झालेले महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक यांची ही पहिलीच सभा असल्याने मा.कुलगुरु यांचा सत्कार श्री. गायकवाड बी. आर. यांच्या हस्ते व महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक यांचा सत्कार श्री. पाटील टी. आर. यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून करण्यात आला.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ]** **दि.१९ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या शेहचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** **दि.१९ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या शेहचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव :** **मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] सामाजिकशास्त्रे संकुलातील सहयोगी प्राध्यापक यांना सेवेत कायम करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे संकुलातील सहयोगी प्राध्यापक यांचा खालील दर्शविल्याप्रमाणे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेला आहे.

| अ. क्र. | अध्यापकांचे पूर्ण नाव | धारण केलेल पद | रुजू दिनांक | परिविक्षाधीन कालावधी संपलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. कांबळे गौतम सुबना | सहयोगी प्राध्यापक | २१/१२/२०१० | २०/१२/२०१२ |

परिनियम २७० (३) नुसार संचालक / विभागप्रमुख यांचेकडून परिविक्षाधीन कालावधित कार्यरत असलेल्या अध्यापकांना कायम करावे किंवा कसे याबाबत त्यांचे "Definite remarks and recommendation" मागविले होते. त्यावर सामाजिकशास्त्रे संकुलाच्या संचालकांनी त्यांना सेवेत कायम करावे अश्याप्रकारे कळविले आहे.

तसेच परिनयम क्र.२७० अन्वये सहामाही गोपनिय अहवाल आणि परिनियम क्र.२७४ नुसार वार्षिक स्वंयमूल्यमापन अहवाल संकुलाच्या संचालकांनी पाठवून दिले असून ते मा. कुलगुरु यांनी पुनर्विलोकनही केले आहेत.

तरी उपरोक्त अध्यापकास त्यांच्या नावासमोर नमूद केल्यानुसार संबंधितांचा परिविक्षाधीन कालावधी संपलेल्या दिनांकापासून कायम करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. कांबळे गौतम सुबना, सहयोगी प्राध्यापक यांना दि.२०/१२/२०१२ पासून सेवेत कायम करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] परीक्षा विभाग, कार्यालय आणि विद्यार्थी यांच्या करीता झेरॉक्सींगच्या कामाचे वार्षिक दरकरार करण्याबाबत मे. युनिक सेल्स आणि सर्व्हिस, सोलापूर यांच्याबरोबर झेरॉक्सींगच्या कामाचे वार्षिक दरकरार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः परीक्षा विभागाकडील दि.११/१२/२०१२ रोजीच्या मान्यतेस अनुसरुन वरील विषयांकीत परीक्षा विभाग, कार्यालय आणि विद्यार्थी यांच्या झेरॉक्सींगच्या कामाचे मिटर रीडींग प्रमाणे विजबिल आकरणी व नाममात्र जागेचे भाडे दरमहा रु.५००/- अशा प्रकारे आकरणीसह वार्षिक दरकरार करण्यासाठी आली होती. सदर निविदा प्राप्त होण्याची अंतिम दि.०१/०१/२०१३ ही होती. अंतिम दिनांकापर्यत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| | |
|---|---|
| 1) | Unique Sales & services, Solapur |
| 2) | Abhinay Services, Solapur |
| 3) | Shri Ramsamrath Sevices, Solapur |
| 4) | Prachi Sales & Sevices, Solapur |
| 5) | Gitanjali Xerox Co. Solapur |
| 6) | Sunshine Sevices, Solapur |

सदरचा निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा दि.०३/०१/२०१३ रोजी खरेदी समिती सदस्यांसमोर उघडून सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम दर असलेल्या **मे. युनिक सेल्स आणि सर्व्हिस, सोलापूर** यांना कामाचे आदेश देण्याची शिफारस करण्यात आली आहे. सदर फर्मने, खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

| Sr. No. | Particular | Rate Quoted |
|---|---|---|
| 1) | A-4 Size Paper (Single Side) | 0.42 |
| 2) | A-4 Size Paper (Both Side) | 0.59 |
| 3) | A-3 Size Paper (Single Side) | 0.69 |
| 4) | A-3 Size Paper (Both Side) | 1.04 |

वरील तक्त्यानुसार मे. युनिक सेल्स आणि सर्व्हिस, सोलापूर यांनी दर दिले असून सदर कामासाठी वार्षिक अंदाजे रु.४,००,०००/- इतका खर्च येणार आहे. उपरोक्त काम सेवा पुरविणे या प्रकारात मोडत असल्याने सदरची बाब व्यवस्थापन परिषद ठराव क्र.२१ दि.२० जुलै, २०११ नुसार व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

सबब, मे. युनिक सेल्स आणि सर्व्हिस, सोलापूर यांच्याबरोबर वार्षिक दरकरार करुन झेरॉक्सींगच्या कामाचे आदेश देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : परीक्षा विभाग, कार्यालय आणि विद्यार्थी यांच्या करीता झेरॉक्सींगच्या कामाचे वार्षिक दरकरार करण्याबाबत मे. युनिक सेल्स आणि सर्व्हिस, सोलापूर यांच्याबरोबर झेरॉक्सींगच्या कामाचे वार्षिक दरकरार करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] मनुष्यबळ पुरवठा करणारे ठेकेदार यांचेमार्फत विद्यापीठात दरमहा एकत्रित वेतनावर नेमलेल्या ४ कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीची बाब विचारार्थ.**

**(टिपणीः** सदरची बाब दि.१९/११/२०१२ च्या व्यवस्थापन परिषदेसमोर विषय क्र.०६ नुसार खालीलप्रमाणे ठेवली होती.)

(टिपणीः विद्यापीठात कर्मचारी कमी असल्याने विद्यापीठास मनुष्यबळ पुरवठा करणारे ठेकेदारामार्फत विद्यापीठाच्या वेगवेगळया विभागात विशिष्ट स्वरुपाच्या कामकाजाकरीता चार कर्मचारी खालील सुधारीत दरमहा एकत्रित वेतनावर व्यवस्थापन परिषदेच्या दि.३० ऑगस्ट, २०१० च्या बैठकीतील ठराव क्र.३५(१) नुसार कार्यरत आहेत.

| अ. क्र. | पदानाम | विभाग | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|
| १ | संगणक लेखनिक (कुशल) | वित्त व लेखा विभाग | ८,०००/- |
| २ | गनधारी सुरक्षा रक्षक | मा. कुलगुरु कार्यालय | ८,०००/- |
| ३ | तारतंत्री | अभियांत्रिकी विभाग | ६,०००/- |
| ४ | संगणक लेखनिक | रा.से.यो. /क्रीडा / विद्यार्थी कल्याण विभाग | ६,०००/- |
| सदर कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठामार्फत खालीलप्रमाणे खर्च केला जातो. | | | |
| अ. क्र. | तपशिल | संगणक लेखनिक (कुशल) व गनधारी सुरक्षा रक्षक | संगणक लेखनिक व तारतंत्री |
| १ | एकत्रित वेतन | ८,०००/- | ६,०००/- |
| २ | भविष्यनिर्वाह निधी (प्रधान नियुक्त्याचा हिस्सा १३.६१%) | १०८८.८०/- | ८१६.६० |
| ३ | ई. एस. आय (प्रधान नियुक्त्याचा हिस्सा ४.७५%) | ३८०.००/- | २८५.००/- |
| ४ | पुरवठादाराचे सेवा शुल्क | रु.३.५० प्रति कर्मचारी प्रति दिवस (एकत्रित वेतन कर्मचाऱ्यासाठी ३० दिवसाकरीता रु.१०५/-) | |
| ५ | व्यवसायक कर रु. @ १२.३६ (१+२+३+४) | ९५७३.८ x १२.३६% = ११८३.३२/- | ७२०६.६ x १२.३६% = ८९०.७३/- |
| ६ | विद्यापीठाने आदा करावयाचे एकूण रु.(१+२+३+४+५) | १०७५७.१२ ~ १०७५७ (एक व्यक्तीचे प्रति महा वेतन) | ८०९७.३३ ~ ८०९७ (एक व्यक्तीचे प्रति महा वेतन) |

महागाई निर्देशाकांत वाढ झालेने सदर एकत्रित वेतनावरील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या एकत्रित वेतनात वाढ करणेबाबत विनंती केलेली आहे. सबब पूर्वीपासून एकत्रित वेतनावार कार्यरत असलेले चार कर्मचारी यांची दरमहा एकत्रित वेतनात वाढ करण्याची बाब विचारार्थ.

ठरावः सदरचा विषय पुढील सभेत पुनशः सादर करावा असे ठरले. याबाबत अधिकची माहिती खालीलप्रमाणे.

वर नमूद कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनावर EPF कायदा १९५२ नुसार १२.००% कर्मचारी भविष्य निर्वाह पाटी व कर्मचारी राज्य विमा मंडळ, ESI कायदा १९५० नुसार १.७५% ESI कर्मचारी हिस्सा संबंधितांचे माहे एकत्रित वेतनातून कपात केला जातो. त्यानुसार संबंधित ठेकेदार हे संबंधितांच्या माहे एकत्रित वेतनातून कपात करुन EPF कार्यालय व राज्य विमा मंडळाकडे सदरच्या रक्कमेचा भरणा करतात.

वर नमूद कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनावर EPF कायदा १९५२ नुसार १२.००% प्रधान नियोक्तच्या हिस्स्याचे (कर्मचारी भविष्य निर्वाह पोटी) व १.६१% प्रशासकीय खर्च असे एकूण १३.६१% कर्मचारी भविष्य निर्वाह पोटी तसेच कर्मचारी राज्य विमा मंडळ, ESI कायदा १९५०

नुसार ४.७५% प्रधान नियोक्त्याचा हिस्सा विद्यापीठामार्फत आदा करण्यात येतो.

सबब, एकत्रित वेनावर पुरवठादारामार्फत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित वेतनामध्ये वाढ करण्याची बाब व त्या अनुषंगाने EPF कायदयानुसार भविष्य निर्वाह निधी प्रधान नियुक्त्याच्या हिस्सा प्रशासकीय खर्च तसेच राज्य विमा मंडळ नुसार ESI कायदयानुसार प्रधान नियुक्त्याचा हिस्सा आदा करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **मनुष्यबळ पुरवठा करणारे ठेकेदार यांचेमार्फत विद्यापीठात दरमहा एकत्रित वेतनावर नेमलेल्या ४ कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये खालीलप्रमाणे एकत्रित वेतनाच्या २५% वेतनवाढीस मान्यता देण्यात आली व वाढीव वेतनावर नियमाप्रमाणे प्रधान नियोक्त्याचा हिस्सा PF, ESI इत्यादी देण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र. | पदनाम | विभागाचे नाव | सध्या देण्यात येणारे एकत्रित वेतन | २५%वेतन वाढीनंतर द्यावयाचे एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १) | संगणक लेखनिक (कुशल) | वित्त व लेखा विभाग | ₹८,०००/- | ₹१०,०००/- |
| २) | गनधारी सुरक्षा रक्षक | कुलगुरु कार्यालय | ₹८,०००/- | ₹१०,०००/- |
| ३) | तारतंत्री | अभियांत्रिकी विभाग | ₹६,०००/- | ₹७,५००/- |
| ४) | संगणक लेखनिक | रा. से. यो. / क्रीडा / विद्यार्थी कल्याण विभाग | ₹६,०००/- | ₹७,५००/- |

**[ ०६ ] राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर यांना एक्सप्रेस फिडर लाईन वरुन विद्युत कनेक्शन देणेबाबत विचारार्थ.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठ व दुध पंढरी या दोघांमध्ये असलेल्या विद्युत एक्सप्रेस फिडर लाईन कनेक्शन मधून राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर यांना विद्युत एक्सप्रेस फिडर लाईन मधून विद्युत कनेक्शन मिळणेबाबत मा. आर. के. पाल, संचालक, राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर वरील संदर्भिय पत्रान्वये नाहरकत (NOC) ची विनंती केली आहे.

विद्युत एक्सप्रेस कनेक्शन लाईन देणेबाबतची पाश्र्वभूमी खालीलप्रमाणे आहे.

एक्सप्रेस विद्युत फिडर कनेक्शन सोलापूर विद्यापीठ व दुध पंढरी या दोघामध्ये एकूण खर्च रक्कम रु.२६,०६,२००/- रक्कम पैकी विद्यापीठाने रु.१३,०३,१००/- व दुध पंढरीने रु.१३,०३,१००/- हिस्सा भरुन घेण्यात आलली आहे.

तसेच यानंतर खालीलप्रमाणे एक्सप्रेस फिडर पोटी हिस्सा भरुन एक्सप्रेस फिडर कनेक्शन देण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | भारत रत्न इंदिरा गांधी कॉलेज, केगांव | रु.१२,९३,३७५/- | व्यवस्थापन परिषद सभा दि.२८/०२/२०११ रोजीच्या ठराव क्र.१४ |
| २ | मे. डि. एस. के. मोटार्स, सोलापूर | रु.१२,९३,३७५/- | व्यवस्थापन परिषद सभा दि. १२/०१/२०१२ रोजीच्या ठराव क्र.१५ |

सबब, मा. आर. के. पाल, संचालक, राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर येथे दि.२३/११/२०१२ रोजीचे पत्र एक्सप्रेस फिडर लाईन वरुन राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर यांना विद्युत कनेक्शनची नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची केलेली विनंती विचारार्थ).

ठराव : **राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर ही केंद्र शासनाची संशोधन संस्था असल्याने व भविष्यात सदर संस्थेकडून संशोधनाबाबत विद्यापीठास फायदा होण्याची शक्यता असल्याने यांना एक्सप्रेस फिडर लाईनवरुन विद्युत कनेक्शन देण्याबाबत कोणतेही शुल्क न आकारता नाहरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] BSNL NMEICT कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आल्याने त्यांचे उर्वरित देयक आदा करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: BSNL NMEICT ची कार्यप्रणाली विद्यापीठात सुरु करण्याबाबत दि.17/03/2011 रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. 16 खालीलप्रमाणे ठेवण्यात आला होता.

**विषय क्र. 16 बीएसएनएल एनएमआयईसीटी विद्यापीठात कार्यान्वित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: BSNL NMEICT Project चा प्रस्ताव Ministry of HRD कडून पुरस्कृत झाला असून सदर प्रणाली घेण्यासाठी होणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Total Cost / University | BSNL Share (Discount) | Ministry Share | Universities Share |
|---|---|---|---|---|
| 1 | Rs.2 Crore | Rs.20 Lakhs | Rs.1.35 Crores | Rs.45 Lakhs |

विद्यापीठ कार्यालयाकडून BSNL च्या प्रस्तावावर प्रा. पी. बी. जोशी यांच्याकडून तांत्रिक अभिप्राय मागविण्यात आलेला असून तो सोबत जोडला आहे. सबब, NMEICT ही प्रणाली विद्यापीठात लागू करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : बीएसएनल एनएमइआयसीटी कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यासाठीच्या प्रस्तावावरील डॉ. पी. बी. जोशी यांनी दिलेल्या तांत्रिक अभिप्राय विचारात घेवून बीएसएनएल एनएमइआयसीटी कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली.**

उपरोक्त ठरावानुसार BSNL यांनी दि.31/03/2011 रोजी विद्यापीठात NMEICT ही कार्यप्रणाली कार्यान्वित केली. डॉ. जोशी यांच्या तांत्रिक अभिप्रायानुसार BSNL यांना रु.10,00,000/- प्रति वर्ष याप्रमाणे पहिले चार वर्ष व पाचव्या वर्षी रु.5,00,000/- असे एकूण रु.45,00,000/- द्यावे अशी शिफारस होती. सदरनुसार BSNL यांना रकमेचा पहिला हप्ता म्हणून रु.10,00,000/- (9,06,618/- Installation amount + 93,382/- Taxes as applied) असे देण्यात आलेले आहेत.

सदर प्रणालीवरील उर्वरित रक्कम रु.35,93,382/- (रु.45,00,000/- - रु.9,06,618/-) व त्यावरील इतर सर्व कर मिळून रु.40,37,524/- अशी मागणी BSNL च्या दि.03/01/2013 रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

सदर कार्यप्रणाली व्यवस्थितरीत्या कार्यरत असल्याचे NMEICT समन्वयक प्रा. आर. एस. मेंते यांनी प्रमाणित केले आहे.

सबब, BSNL यांना NMEICT कार्यप्रणालीकरिताची उर्वरित रक्कम रु. रु.35,93,382/- व त्यावरील इतर सर्व कर मिळून रु.40,37,524/- अशी आदा करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : BSNL NMEICT कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आल्याने त्यांचे उर्वरित देयक दि.16 मार्च रोजी अधिसभेच्या सभेमध्ये अंदाजपत्रकास मंजूरी मिळाल्यानंतर एकरकमी आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] व्यवस्थापन परिषद ठराव क्रं १५ दि.२०/०७/२०१२ अन्वये व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या विरोधात अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा बहुउददेशिय संस्था, सर्जापूर, ता.बार्शी, जि. सोलापूर यांनी वकिलामार्फत दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ.**

**(टिपणी :**श्री.तकडे अण्णासाहेब गुंडप्पा हे शै.वर्ष २०११-१२ मध्ये जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग या महाविद्यालयात बी.एड या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत व त्याच कालावधीत श्री नूतन प्रशाला, विजापूर रोड, सोलापूर या महाविद्यालयात पूर्ण वेळ शिक्षक म्हणून कार्यरत असल्याची तक्रार श्री. सुरवसे अनिल रामचंद्र यांच्याकडून प्राप्त झालेली होती.

सदर तक्रारीची तथ्यता पडताळून घेण्यास्तव मा.मुख्याध्यापक, नूतन प्रशाला, विजापूर रोड, सोलापूर व मा.अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा बहुउददेशिय संस्था, संचलित जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांना पत्राव्दारे आवश्यक माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने मा.प्र.मुख्याध्यापक, श्री नूतन प्रशाला, विजापूर रोड, सोलापूर व जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग यांच्या कडून माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झालेली होती.

**मा.प्र.मुध्याध्यापक,नूतन प्रशाला यांनी** श्री.तकडे आणासाहेब गुंडप्पा हे नूतन प्रशाला, सोलापूर या शाळेत शै.वर्ष २०११-१२ मध्ये पूर्णवेळ शिक्षकपदी असल्याचे व त्यांची नेमणूक दि.२१.०७.२००३ झालेली असून ते आजतागय कार्यरत असल्याचे कळविले होते. तसेच त्यांनी श्री.तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांचे सेवापुस्तिका व हजेरी पत्रकाची सत्यप्रती सादर केलेली होती.

**जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग, ता.बार्शी यांनी** श्री.तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांनी नोकरी करत नसल्याचे महाविद्यालयाकडे सादर केलेल्या हमीपत्राची छायांकित प्रत व ते सतत गैर हजर राहिल्यामुळे महाविद्यालयाने सदर बाबत केलेल्या पत्र व्यवहाराची छायांकित प्रत सादर केलेली होती.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेली माहिती व त्यासोबतची कागदपत्रे अवलोकनार्थ घेता प्रस्तुत तक्रारी संदर्भात सर्वकष चौकशी होणे हे अत्यंत जरूरीचे असल्याने खालील प्रमाणे मा.कुलगुरु महोदयांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केलेली होती. तोपर्यंत प्रस्तुत प्रकरणातील गैरतक्रारदार श्री.तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांचा बी.एड अभ्यासक्रमाचा निकाल राखीव ठेवण्याबाबत परीक्षा विभागास कळविण्यास आले होते.

**१. प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर, अध्यक्ष, २. प्रा.डॉ.इनामदार ए.ए, सदस्य**
**३. प्राचार्य डॉ.एस.बी.क्षीरसागर, सदस्य**

उपरोक्त समितीने संबंधितांकडे प्रत्यक्ष भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीत तथ्यता असल्याचे निदर्शनास आले होते.

प्राप्त अहवालानुसार श्री.तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांनी जाणूनबुजून नोकरी करत नसल्याचे खोटे हमीपत्र सादर केले होते. व महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याची उपस्थिती ७५ टक्के भरलेली नसताना संबंधित विद्यार्थ्यांचा परीक्षा फॉर्म विद्यापीठाकडे सादर केलेला होता. सदर प्रकरणात दोन्हीं पक्षकारांनी गंभीर स्वरुपाचे

कृत्य केलेले होते.

उपरोक्त प्रकरण व प्राप्त अहवालावर मा.कायदा अधिकारी यांच्याकडे सदर बाबत पुढील कोणती कार्यवाही करावी याबाबत कायदेशिर सल्ला मागविण्यात आला असता तक्रारीची पडताळणी करण्यास्तव समितीने सादर केलेल्या अहवालानुसार व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे अवलोकनी घेता श्री.तकडे अण्णासाहेब व जय जगदंबा शिक्षणशात्र महाविद्यालय व इतर यांनी सादर केलेले म्हणणे हे परस्पर विरोधी असल्याचे सकृत दर्शनी दिसत असल्याचे व याबाबतची शहनिशा करणेकामी नैसर्गिक न्याय तत्वानुसार श्री.तकडे व इतर संबंधितांना व्यवस्थापन समिती समोर प्रत्यक्ष हजर राहून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून तद्‌नंतर निर्णय घेणे उचित होईल असे कळविले होते.

त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरण दि. २०.०७.२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आला होता व म्हणणे सादर करण्यास्तव संबंधितांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर बैठकी दरम्यान उभयतांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले होते. सदर प्रकरणाबाबत व्यवस्थापन परिषदेने खालील प्रमाणे निर्णय दिलेला होता.

१. श्री.तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांचा बी.एड अभ्यासक्रमाचा Performance रदद करावा.

**२. जय जगदंबा बहुउददेशिय संस्था, सर्जापूर, ता.बार्शी या संस्थेस दंडक क्रं [o].४४ नुसार एका विद्यार्थ्यांच्या टयूशन फिच्या १० पट दंड करावा.**

उपरोक्त निर्णयानुसार परीक्षा विभागास श्री.तकडे अ.गुं याचे Performance रदद करण्याची पुढील कार्यवाही करण्याबाबत अंतर्गत कार्यालयीन टिपणी निर्गमित व मा.अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांना रु.३,१४,२००/- इतकी दंडाची रक्कम भरण्याबाबत पत्राव्दारे कळविले होते व दि.०२.०७.२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार परीक्षा विभागाकडून श्री.तकडे अ.गुं यांचा Performance रदद करण्यात आला आहे.

तथापि संबंधित संस्थेकडून दंडाची रक्कम न भरल्याने संस्थेस पुनःश्च दि.१५.१०.२०१२ रोजीच्या स्मरण पत्राव्दारे कळविण्यात आले होते. या उपरोक्तही संस्थेने दंडाची रक्कम न भरल्याने पुनःश्च दि. १९.११.२०१२ रोजी आणखी एक स्मरण पत्र निर्गमित करण्यात आले होते. दोन स्मरण पत्रे पाठवूनही संस्थेने दंडाची रक्कम न भरल्याने पुनःश्च अंतिम स्मरण पत्र व दि. ३१.१२.२०१२ पर्यंत दंडाची रक्कम भरण्याबाबत कळविण्यात आले होते व विहीत मुदतीत दंडाची रक्कम न भरल्यास महाविद्यालयावर म.वि.कायदा १९९४ व तद्‌अनुषंगिक परिनियमान्वये कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले.

***त्यास अनुसरुन संस्थेच्या वतीने ॲड, रणजीत नेताजी गुंड यांचे उत्तर पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. सदर पत्र मा.कायदा अधिकारी यांचेकडे सादर करुन त्यांचा अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार कायदा अधिकारी यांनी संथेने रक्कम भरण्याचे नाकारुन मा.व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यास नाकारले असल्याने सदरचे उत्तर येत्या मा.व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करुन परिषदेकडून पुढील मार्गदर्शन घेणे जास्त योग्य व उचित राहील असा अभिप्राय सादर केलेला आहे.***

सबब व्यवस्थापन परिषद ठराव क्रं १५ दि.२०.०७.२०१२ अन्वये व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या विरोधात अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा बहुउददेशिय संस्था,सर्जापूर, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी वकिलामार्फत दिलेल्या पत्राच्या अनुषेंगाने पुढील कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **"अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा बहुउददेशिय संस्था, सर्जापूर, ता.बार्शी, जि. सोलापूर यांनी दंडाची रक्कम एक महिन्यात भरावी अन्यथा महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ व तदअनुषंगिक परिनियमान्वये कार्यवाही करण्यात येईल" अशा प्रकारची नोटीस विद्यापीठ पॅनलमधील वकीलामार्फत देण्यात यावी असे ठरले.**

**[ ०९ ] दि.०६/०२/२०१३ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी: बांधकाम समितीची सभा दि.०६/०२/२०१३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. परिनियम S.339 (f) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 339 (f) | After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Building and Works Committee shall be placed before the Management Council for its approval. |

त्यानुसार दि.०६/०२/२०१३ रोजीच्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील ठराव क्र.२ ते १० व ११ (१) विचारार्थ).

**ठराव : दि.०६/०२/२०१३ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील ठराव क्र.२ ते १० व ११ (१) यास मान्यता देण्यात आली.**

## [ १० ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०११ -१२ चा वार्षिक मराठी अहवाल विचारार्थ.

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (गग) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

| |
|---|
| वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्विकारणे आणि ते अधिसभेकडे मान्यतेसाठी पाठवणे. |

सबब, सन २०११-१२ चा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील समितीचे गठण केलेले होते.

| | |
|---|---|
| १) डॉ. लोणीकर एस. व्ही. | अध्यक्ष |
| २) डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| ३) डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ४) डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ५) डॉ. श्रीमती ॲनी जॉन | सदस्या |
| ६) श्रीमती चोपडे ए. बी., सहा. कुलसचिव | सदस्य सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकूले व प्रशासनाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन, वेळोवेळी बेठका घेऊन, सदरचा मराठी अहवाल तयार करुन, व्यवस्थापन परिषदेकडे मान्यता देण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर सदरच्या अहवालास अधिकसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १०४ (१) व १०४ (२) ची तरतूद खालीलप्रमाणे -

**Section 104 (1)**

| |
|---|
| The Annual Report of the university shall be prepared and published by the university and such report as approved by the Management Council shall be submitted to the Chancellor, State Government and Senate. The Senate may consider the annual report in its meeting and may make recommendations as it deems fit. The management Council shall take appropriate action on the recommendations of the Senate and report the action taken to the Senate. |

**Section 104 (2)**

| |
|---|
| namely - (z) The State Government shall cause the annual report of the university, received by it, to be laid before each House of the State Legislature. |

सबब, सन २०११-२०१२ साठीचा वरील समितीने तयार केलेला वार्षिक अहवाल विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठाचा सन २०११-१२ चा वार्षिक मराठी अहवाल दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ ११ ] सोलापूर विद्यापीठाचा २०११-२०१२ चा मराठी वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

**(टिपण:** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १०४ मधील तरतुदीनुसार, सोलापूर विद्यापीठाचा २०११-२०१२ चा ८ वा मराठी भाषेतील वार्षिक अहवाल तयार करण्यात आला असून सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/२/२०१३ रोजीच्या सभेत विषय क्र.१० अन्वये, सादर करण्यात आला आहे.

सदरचा सन २०११-१२ चा ८ वा वार्षिक अहवाल अधिसभेच्या दि.१६/३/२०१३ रोजीच्या सभेत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सन २०११-१२ चा ८ वा वार्षिक अहवाल अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठाचा २०११-२०१२ चा मराठी वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने डॉ. लोणीकर एस. व्ही. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १२ ] विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंजदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक विचारार्थ.**

(टिपणी:- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२)(e) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर | सदस्य |
| २. | प्रा. डॉ. बी. एच. कुलकर्णी | सदस्य |
| ३. | श्री. बी. आर. गायकवाड | सदस्य |
| ४. | श्री. एस. एच. रिसबुड | सदस्य |
| ५. | प्रा. डॉ. डी. डी. पुजारी | सचिव |

सदर उपसमितीने तयार केलेले सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.०२/०२/२०१३ रोजी झालेल्या सभेसमोर विषय क्र.०२ नुसार सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

**ठरावः** सन २०१२-१३ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

**सबब, विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ च्या मूळ अंदाजपत्रकास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ).**

**ठराव : विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंजदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत अधिसभेस दुरुस्तीसह मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ १३ ] विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

(टिपणीः- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (e) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या दि.१६/०३/२०१३ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या सभेस सादर करण्यात येणार आहे.

**सबब, विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाची बाब विचारार्थ).**

ठराव : **विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने श्री. गायकवाड बी. आर. नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १४ ] शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधांचे दर निश्चित करणेबाबत.**

(टिपणीः महाराष्ट्र शासन निर्णय एसयुएस/२००८/(३६४/०८) विशि-५ दि.२८/०३/२००९ नुसार विद्यापीठास शास्त्रीय उपकरणे खरेदीसाठी रु.२,७८,८७,९२६.००/- इतका निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधून विद्यापीठाच्या शास्त्रीय उपकरण केंद्रासाठी विविध उपकरणे खरेदी करण्यात आलेली आहेत. तसेच काही उपकरणांची खरेदी प्रक्रिया चालू आहे. खरेदी केलेल्या शास्त्रीय उपकरणांचे installation सध्या चालू आहे. ही उपकरणे install झाल्यानंतर शास्त्रीय उपकरण केंद्राकडे जी Samples प्राप्त होतील त्यांचे Sample analysis साठी वापरण्यात येतील, त्यामुळे प्रत्येक उपकरणांकरीता प्रती Sample analysis चे दर ठरविणे आवश्यक आहे. हे दर ठरवित असताना (१) सोलापूर विद्यापीठतील अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये (२) सोलापूर विद्यापीठा व्यतीरिक्त इतर संस्था (३) इंडस्ट्रिज, अशा तीन गटांकरीता ठरवणे उचीत वाटते. सोबत विविध शैक्षणिक संस्था व विद्यापीठातील Sample analysis च्या दरांचा तुलनात्मक आढावा घेऊन, सोलापूर विद्यापीठाचे दर समन्वयक, शास्त्रीय उपकरण केंद्र यांनी प्रस्तावीत केलेले आहेत.

सबब समन्वयक, शास्त्रीय उपकरण केंद्र यांनी सोबत जोडलेल्याप्रमाणे प्रस्तावीत केलेले दर सोलापूर विद्यापीठाच्या शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधांसाठी लागू करणेची बाब विचारार्थ).

**ठराव : शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधांचे दर खालील दुरुस्तीसह निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**1) IR Instruments चे सोलापूर विद्यापीठाचे दर ₹100/- ऐवजी ₹75/- आकारण्यात यावेत.**

**[ १५ ] श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली (बडतर्फ वाहचालक, खुला प्रवर्ग) यांनी दि.२८/०१/२०१३ रोजी विद्यापीठास सादर केलेला अर्ज विचारार्थ.**

(टिपणी: श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली हे खुल्या प्रवर्गातून वाहनचालक या पदावर विद्यापीठात परिविक्षाधीन कालावधीसाठी दि.२७/०८/२००८ रोजी नियुक्त करण्यात आलेले होते. सदरचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण होण्यापूर्वी त्यांना सेवेतून प्रमाण संहित १९८४ व महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतुदीनुसार यांना दि.०४/११/२००९ रोजी कामावरुन बडतर्फ करण्यात आले आहे.

सदर आदेशाविरुध्द अर्जदार श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली यांनी मा. पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे अपील क्र.८/२०१० ची दाखल केली होती. सदर अपीलाचा निकाल होऊन अर्जदार यांना मागील वेतनासह सेवेत रुजू करण्याबाबत विद्यापीठास आदेशित करण्यात आले होते. सदर निर्णयाविरुध्द विद्यापीठाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.९६७५/२०१० ची दाखल केलेली होती. सदरची याचिका रद्द करताना मा. उच्च न्यायालयाने न्यायाधिकरणाचे आदेश कायम ठेवले होते.

त्याविरुध्द विद्यापीठाने (L.P.A. No. ५१/२०११) L.P.A. Stamp No.५५५५/२०११ ची दाखल केलेली असून सदरची L.P.A. ही मा. उच्च न्यायालयात Admit करण्यात आलेली आहे. तसेच L.P.A. मध्ये न्यायाधिकरणातील आदेशास स्थगिती मिळण्याबाबतचे अर्ज अनु. क्र.६८, ६९ व ७०/२०११ यामध्ये मा. उच्च न्यायालयाने L.P.A. Admit करुन घेताना **"If any appointment is made in the meanwhile, the same shall be subject to the result of these Appeals so that in case the Appeals are dismissed, the selected employees may have to go home. Therefore, in the appointment order it should be expressly provided that the appointment is subject to the result of the Appeals."** असे आदेश दिलेले आहे.

विद्यापीठाने दि.०८/०३/२०१० रोजीच्या जाहिरातीनुसार श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली यांच्या बडतर्फीने रिक्त झालेल्या वाहनचालक या पदावर श्री. पवार महेश दिगंबर यांची दि.३१/१२/२०११ रोजी नियुक्ती करुन मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अट नमूद करुन नियुक्ती करण्यात आली आहे. सदरची अट नमूद करताना याचिकेचा क्रमांक चुकल्याने त्यांना दि.१९/०५/२०१२ रोजीचे सुधारीत आदेश देण्यात आले. (दोन्ही आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

सध्य स्थितीत वरीलप्रमाणे मा. पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द व मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.९६७५/२०१० मधील आदेशाविरुध्द सोलापूर विद्यापीठाने मा. उच्च न्यायालयात L.P.A. No. ५१/२०११ ची दाखल केलेली असून ती प्रलंबित आहे.

श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली यांच्या प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या वतीने प्रस्तुत कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वकीलांशी फोनवर झालेल्या चर्चेनुसार त्यांनी प्रस्तुतचे अर्ज हे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करुन होणाऱ्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कारवाई करणे जास्त योग्य व उचित राहील असे कळविलेले आहे. त्यानुसार श्री. हरीश भालचंद्र गारमपल्ली यांचा दि. २८/०१/२०१३ रोजीचा अर्ज विचारार्थ).

**ठराव :** **मा. उच्च न्यायालयासमोर तडजोड करुन आदेश घेण्यात यावेत.**

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**